# ६. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

**१) प्रस्तावना :**

महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्चशिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता, त्याला संस्कृतीने वाढवावे, हा शिक्षणाचा मूळ दृष्टिकोन आहे. आजच्या उच्चशिक्षण पद्धतीत शिक्षण उच्च आहे, पण विद्यार्थीदेखील उच्च कोटीचा बनावा, त्याला सामाजिक जाणीव असावी, त्याने राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास घ्यावा तसेच व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केवळ पुस्तकी वा बौद्धिक शिक्षणाने होऊ शकणार नाही. शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून व्यक्तित्त्व विकसित होत असते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच पुणे विद्यापीठाने उच्चशिक्षण घेत असताना, विद्यार्थ्यांवर श्रम- संस्कारांचाही वर्षाव व्हावा, त्यांनी हा ठेवा चिरंतन जपावा, या उदात्त हेतूने कमवा व शिका योजना सुरू करून : 'ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान' या विद्यापीठ गीतातील मंगेश पाडगांवकरांच्या ओळीला प्रत्यक्षात अर्थ प्राप्त करून दिला आहे.

**२) योजनेची उद्दिष्टे :**

अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक साहाय्य करणे.

ब) मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.

क) ज्ञानसेवक (Knowledge Servant) बनविणे.

ड) स्वयंरोजगाराबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे.

ई) विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची ( Work Culture ) जाणीव निर्माण करणे.

**३) योजनेकरिता पात्रता :**

या योजनेतंर्गत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक रु. ८,००,०००/- (रु. आठ लाख फक्त) पर्यंत/उत्पन्नाची मर्यादा प्रचलीत शासकीय नियमानुसार असेल अशाच विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करुन घ्यावेत. सदर विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला मा. तहसीलदार, यांचे स्वाक्षरीचा असावा. अथवा नोकरी करणाऱ्या पालकांचा उत्पन्नाचा फॉर्म नं. १६ हा उत्पन्नाच्या मर्यादेसाठी ग्राह्य धरावा.

सदरची योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठाच्या विविध विभागांमधून उच्चशिक्षण संपादन करणाऱ्या पदवी अथवा पदव्युत्तर वर्गात शिक्षण घेणाऱ्या नियमित (Regular) विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी लागू राहिल. या योजनेची अंमलबजावणी संबंधित संलग्न महाविद्यालयांमार्फत / मान्यताप्राप्त संस्थांमार्फत करण्यात येईल. तथापि, महाविद्यालयास/ मान्यताप्राप्त संस्थेस कमवा व शिका योजना कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे दरवर्षी अनिवार्य असेल. मागील वर्षी ज्या महाविद्यालयांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा योग्य वापर करून, योजना प्रभावीपणे राबविली असेल, अशा महाविद्यालयांना प्राधान्य देण्यात येईल.

**४) योजनेसाठी अनुदान :**

संलग्न महाविद्यालय/ मान्यताप्राप्त संस्थांच्या पातळीवर कमवा व शिका योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, ज्या महाविद्यालयांनी /मान्यताप्राप्त संस्थांनी सदर योजनेची मान्यता धारण केली आहे, त्यांनी विद्यापीठाकडे वर्षअखेरीस हिशेब सादर केल्यानंतर त्यांना नियमानुसार अर्थसाहाय्य अदा करण्यात येईल. यासंबंधीचे नियम व अटी खालीलप्रमाणे असतील :

महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानात एकसूत्रता आणणेकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' या योजनेत सहभागी सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेची टक्केवारी ही ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाकडून १०%) या टक्केवारीनुसार अनुदान देय असावे, अशी शिफारस करण्यात येत आहे. समितीने योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थी संख्येचा विचार करुन पूर्वीच्या अनुदानात खाली नमुद केल्यानसुासार बदल सुचविले तक्त्यात नमुद केलेल्या सुचीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून महाविद्यालय व संस्थांना अनुदान प्रदान करण्यात यावे, अशी शिफारस केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यशालय व मान्यताप्राप्त संस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे कमाल अनुदान देण्यात यावे आणि या अनुदानाच्या कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त झालेला खर्च हा योजना राबविणाऱ्या महाविद्यालय/संस्थेनी स्वतः करावयाचा आहे. अशी शिफारस केली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यार्थी संख्येच्या सुधारित टप्पा व सुधारित कमाल मर्यादा पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयातील विद्यार्थी-संख्या | अनुदानाची कमाल मर्यादा रु. |
|---|---|---|
| १. | १ ते ५०० | ७५,०००/- |
| २. | ५०१ ते १००० | १,५०,०००/- |
| ३. | १००१ ते १५०० | २,२५,०००/- |
| ४. | १५०१ ते २००० | ३,००,०००/- |
| ५. | २००१ ते २५०० | ३,७५,०००/- |
| ६. | २५०१ ते ३००० | ४,५०,०००/- |
| ७. | ३००१ ते ३५०० | ५,२५,०००/- |
| ८. | ३५०१ ते ४००० | ६,००,०००/- |
| ९. | ४००१ ते ४५०० | ६,७५,०००/- |
| १०. | ४५०१ ते ५००० | ७,५०,०००/- |

प्रवेशित विद्यार्थी संख्या ५००१ च्या पुढे प्रत्येकी ५०० विद्यार्थ्यांच्या टप्प्यांनुसार (म्हणजेच ५००१ ते ५५०० - रू. ८,२५,०००/-, ५५०१ ते ६०००- रू. ९,००,०००/ - या नुसार पुढे) प्रत्येकी रू. ७५,०००/- प्रमाणे अनुदानाची कमाल मर्यादा असेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वरीलप्रमाणेच कमाल अनुदान देय असेल आणि या अनुदानाच्या कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त झालेला खर्च हा योजना राबविणाऱ्या संबंधित महाविद्यालय/संस्थेनी स्वतः करावयाचा आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना कामाचे मानधन दरमहा मिळावे या हेतूने महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त परिसंस्थांना सदर योजनेसाठी गतवर्षी विद्यापीठाने दिलेल्या अनुदानाच्या ५०% रक्कम प्रथम हप्ता (First Installment) म्हणून तसेच ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना मागील वर्षी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या कमाल मर्यादेच्या जास्त अनुदान मिळाले आहे अशा महाविद्यालयांना/परिसंस्थांना महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या कमाल अनुदान टप्प्यांपैकी ५०% रक्कम प्रथम हप्ता (First Installment) म्हणून शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस दिली जाते.

उन्हाळ्याच्या सुट्टीत केवळ एप्रिल ते मे या कालावधीत (परीक्षा व सार्वजनिक सुट्ट्यांचा कालावधी सोडून) राबविण्याकरिता मान्यता देण्यात येते. वरील कालावधीत या योजनेवर झालेला खर्चाचा हिशेब चालू आर्थिक वर्षात केंद्रीय लेखापरीक्षणाच्या वेळी एकत्रित सादर करावा. उन्हाळी सुट्टीतील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा खर्च अतिरिक्त न देता त्याच वर्षातील प्राप्त अनुदानात गृहीत धरला जाईल.

अ) या योजनेतंर्गत उपलब्धतेनुसार काम विद्यापीठातील तसेच सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थामधील विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

ब) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणाऱ्या महाविद्यालय/संस्थांनी आपला अहवाल प्रत्येक तीन महिन्यांनी मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांना पाठविणे आवश्यक आहे.

क) पुर्नप्रवेशित, अनुत्तीर्ण विद्यार्थी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत प्रवेशास अपात्र असतील.

ड) योजनेत सहभागी विद्यार्थ्यांचे वर्गातील हजेरीचे प्रमाण किमान ७५% असणे आवश्यक आहे.

**५) अर्ज करण्याची पद्धत :**

सदर योजना महाविद्यालयात/ मान्यताप्राप्त संस्थेत राबविण्यास मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा. संचालक, विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ यांना राहतील. मान्यता प्राप्त करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात विद्यार्थी विकास मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदरचा प्रस्ताव मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे-७ यांनी कळविलेल्या अंतिम दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा सदर योजना राबविण्यासाठी विचार केला जाणार नाही.

पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांकडून/ मान्यताप्राप्त संस्थांकडून आलेल्या प्रस्तावांची छाननी करून नियमानुसार विचार करून सदर योजनेसाठी महाविद्यालयाची निवड केली जाईल. तद्नंतर महाविद्यालयाला मान्यतेचे पत्र पाठविण्यात येईल. मान्यताप्राप्त केलेल्या महाविद्यालयांना/संस्थांना ही योजना राबविता येईल. यातील विलंब टाळण्यासाठी प्रस्ताव वेळेत दाखल क रावेत.

**६) योजनेची अंमलबजावणी :**

**अ) विद्यार्थ्यांची निवड :**

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या प्रवेशासंदर्भातील विस्तृत सूचना महाविद्यालयाच्या सूचना-फलकावर लावून विद्यार्थ्यांना विहित नमुन्यात अर्ज (सोबत जोडला आहे) सादर करण्यासाठी आवाहन करावे. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची तद्नंतर छाननी करण्यात येईल. महाविद्यालयातील सल्लागार समितीमार्फत विद्यार्थ्यांची निवड होईल व समितीचा निर्णय अंतिम राहिल. सदर समितीने निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची एक प्रत मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे-७ यांना विहीत वेळेत पाठवावी.

**ब) 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत करावयाची कामे**

सर्वसाधारणपणे **' कमवा व शिका'** योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी खालील कामे करावीत, परंतु स्थानिक परिस्थितीनुसार सल्लागार समितीच्या मान्यतेने इतर कामांचा समावेश करता येईल :

अ) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये अवगत होणेकरीता विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी काम द्यावे.

ब) नर्सरीच्या माध्यमातून रोपे तयार करणे.

क) विद्यापीठास किंवा महाविद्यालयास आवश्यक स्टेशनरी साहित्य तयार करणे. उदा. पॅड, फाईल, वह्या पाकिटे इत्यादी.

ड) फोन कॉल सुविधेमध्ये वसतिगृह प्रशासनाला मदत करणे.

इ) ज्या विद्यार्थ्यांकडे प्लबिंग, इलेक्ट्रिकल, कार्पेन्टरी व तत्सम प्रमाणपत्रे असतील अथवा या कामाची माहिती व आवड असल्यास ती कामे त्यांना उपलब्ध करुन द्यावीत.

ई) विद्यापीठात किंवा महाविद्यालयात शैक्षणिक प्रयोगशाळेत सहाय्यक म्हणून काम देणे. तेथील उपकरणे हाताळण्याचे प्रशिक्षण देऊन Instrument Operator इत्यादी प्रकारचे काम देणे.

उ) टायपिंगची तसेच मुद्रणालयातील कामे देऊन प्रशिक्षित करणे.

ऊ) विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विभागप्रमुख व प्राध्यापकांना संशोधनासाठी सहाय्यक म्हणून मदत करणे.

ए) ग्रंथालयात मदतनिस म्हणून काम देणे.

ऐ) विविध विभागांत संगणकावर आधारित कामे देण्यात यावी. सदर कार्यालयीन कामे विद्यार्थ्यांना देत असताना कार्यालयाची गोपनीयता व सदर कामाचा गैरवापर होणार नाही याची संबंधित विद्यार्थी कल्याण अधिकारी व सेवकांनी खबरदारी घेण्यात यावी.

**क) कामाचे तास :**

**'कमवा व शिका'** योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांस खालीलप्रमाणे काम देता येईल :

**१) कार्यालयीन कामे :** विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवशी जास्तीतजास्त तीन तास कार्यालयीन काम देता येईल. ज्या दिवशी कार्यालयास सुट्टी असेल, त्या दिवशी कार्यालयीन काम बंद असेल व हजेरी-पत्रकावर विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची नोंद असेल.

**२) फील्ड वर्क :** विद्यार्थ्याला प्रत्येक दिवसाला जास्तीत जास्त तीन तास फील्ड वर्क करता येईल. कार्यालयाला सुट्टी असेल त्या दिवशीही फील्ड वर्क करता येईल.

३) विद्यार्थ्यांना महिन्याला जास्तीत जास्त ९० तास इतके काम देण्यात यावे.

४) १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे या दिवशी विद्यार्थ्यांना काम देण्यात येऊ नये.

**ड) 'कमवा व शिका' योजनेच्या कामाचा दर :**

**'कमवा व शिका'** योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कामाच्या प्रत्येक तासाला रु. ४५/- प्रमाणे मानधन देण्यात यावे. यामध्ये कोणताही बदल परस्पर करू नये. सदरच्या दरामध्ये विद्यापीठ अधिकार मंडळाने सुधारणा केल्यास संलग्न महाविद्यालयांना /मान्यताप्राप्त संस्थांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल.

**ई) हजेरी-पत्रक : 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका'** योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे मासिक हजेरी-पत्रक तयार करावे. सदर हजेरी-पत्रक, सोबत दिलेल्या विहित नमुन्याप्रमाणेच असणे आवश्यक आहे. हजेरी-पत्रकामध्ये उपस्थितीबाबत प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. गैरहजर असलेल्या दिवशी 'X' असावी. उपस्थितीबाबत प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे. हजेरी-पत्रकावर कोठेही उपस्थिती अथवा **अनुपस्थितीबाबत अनुक्रमे P किंवा A नमूद केलेले नसावे.** हजेरी-पत्रकाच्या खाली विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.) व प्राचार्यांची सही आवश्यक आहे. हजेरी-पत्रकावर प्रत्येक विद्यार्थ्याचे कामाचे एकूण तास आणि त्याप्रमाणे एकूण मोबदला यांबाबतचा स्पष्ट उल्लेख करावा. हजेरी-पत्रकाचा नमुना सोबत जोडला आहे. त्यात दर्शविल्याप्रमाणेच हजेरी-पत्रक वापरात आणावे.

**फ) मानधन देण्याची पद्धत :**

१) मासिक हजेरी-पत्रकानुसार विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे तास विचारात घेऊन रु. ४५/- प्रतितास याप्रमाणे मानधन देण्यात यावे.

२) कामाचे मानधन दरमहा अदा करून, मानधन मिळाल्याबाबत हजेरी-पत्रकावर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

३) विद्यार्थ्यांच्या कामाचे मानधन धनादेशाद्वारे अदा करण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर दरमहा जमा करावेत.

४) विद्यार्थ्याला धनादेश दिल्यानंतर सदरचा धनादेश क्रमांक हजेरी-पत्रकात विद्यार्थ्यांच्या नावासमोर नमूद करावा.

कमवा व शिका योजना राबविणाऱ्या महाविद्यालयाने योजनेकरिता स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे व ते खाते प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त सहीने चालविण्यात यावे. योजनेच्या नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार बदल झाल्यास संबंधित महाविद्यालयाला/ मान्यताप्राप्त संस्थेला कळविण्यात येईल. सदर नियमावलीत आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करण्याचे अधिकार मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांना असतील.

**८) वार्षिक हिशेब सादर करण्याची पद्धत :**

१) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या फेब्रुवारीअखेरपर्यंत कमवा व शिका योजना महाविद्यालयामध्ये राबवावी.

२) योजनेचे सर्व हिशेब कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक वर्षाच्या दि. १० मार्चपर्यंत पूर्ण करण्यात यावेत. सदर कालमर्यादेची कृपया नोंद घ्यावी.

३) योजनेची वार्षिक हिशेबतपासणी केंद्रीय पद्धतीने विभागनिहाय करण्यात येईल. केंद्रीय हिशेबतपासणीचा कार्यक्रम महाविद्यालयाला स्वतंत्ररीत्या पाठविण्यात येईल. पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक या चार विभागांसाठी स्वतंत्ररीत्या शिबिरे आयोजित करण्यात येतील. केंद्रीय हिशेबतपासणीच्या वेळी हिशेब सादर करताना खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे :

अ) कमवा व शिका योजनेच्या चालू शैक्षणिक वर्षातील मान्यता पत्राची प्रत.

ब) योजनेतील कामाचा तपशिलवार वार्षिक अहवाल.

क) योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी व त्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी.

ड) योजनेतील विद्यार्थ्यांचे मासिक हजेरी-पत्रक.

ई) विद्यार्थ्यांच्या हजेरी-पत्रकानुसार विद्यार्थ्यांना देयके अदा केल्याबाबतचे धनादेश क्रमांक, महाविद्यालयाचे बँक पासबुक जोडावे.

फ) योजनेच्या खर्चाचे हिशेब विद्यापीठ नियुक्त सनदी लेखापालाकडून मार्चअखेर होणाऱ्या केंद्रीय लेखापरीक्षण कार्यक्रमात/शिबिरात केले जाईल. खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र व विवरणपत्र या हिशेबासोबत सादर करावेत. सदर खर्च विनियोग प्रमाणपत्र व विवरणपत्रावर सनदी लेखापाल, विद्यार्थी कल्याण अधिकारी व प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक आहे.

# विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना : प्रवेश-अर्ज

अ.क्र.

| विद्यार्थ्याचा/ विद्यार्थिनीचा अद्ययावत फोटो |
|---|

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक,
---------------------------
---------------------------

*विषय :* कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत प्रवेश मिळण्याबाबत..........

महोदय,

मी, आपल्या महाविद्यालयात/ संस्थेत शैक्षणिक वर्ष २० -२० मध्ये या वर्गात प्रवेश घेतला असून, पुणे विद्यापीठाच्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी असलेल्या कमवा व शिका योजनेत प्रवेश घेऊ इच्छितो. माझी व्यक्तिगत माहिती खालीलप्रमाणे आहे :

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : --- ---------------------------------------------

(आडनाव प्रथम)

२. जन्मदिनांक व पूर्ण वय : --- ---------------------------------------------

३. धर्म व जात संवर्ग : --- ----------------------(सोबत जात प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)

४. मागील वर्षी ज्या विद्यालयात/महाविद्यालयात शिकत होता/होती त्या -

अ) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : --- ---------------------------------------
-

ब) वर्ग : --- ---------------------------------------------------

क) मिळालेले गुण (%) : --- ---------------------------------------------

ड) निकाल : उत्तीर्ण / सवलतीने उत्तीर्ण / अनुत्तीर्ण

ई) मागील वर्षी कमवा व शिका योजनेत काम केले आहे काय? होय/नाही

फ) मागील वर्षाचे कुटुंबाचे एकूण उत्पन्न रु. ----------------------------------------

(उत्पन्नाची कमाल मर्यादा रु.६,००,०००/- (रु. सहा लाख) पर्यंतच असणे अनिवार्य आहे. तसेच मा. तहसीलदार यांची स्वाक्षरी असलेल्या उत्पनाच्या दाखल्याची छायांकीत प्रत जोडावी. तसेच पालकांचे उत्पन्नाचा फॉर्म नं. १६ सुद्धा गृहीत धरण्यात यावा. सदर दाखल्याशिवाय विद्यार्थ्यांना काम देण्यात येवू नये)

५. पालकांची माहिती :

अ) वडिलांचे /पालकांचे नाव व पत्ता : ------------------------------------------
-----------------------------------------------------------

ब) व्यवसाय : --- ---------------------------------------------------

क) कुटुंबातील व्यक्तींची संख्या :---------------------------------------------

ड) जात : ------------- पोटजात : ------------- प्रवर्ग : -------------

६. शासकीय / अशासकीय संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती, विद्यावेतन, शुल्क सवलत अथवा अन्य आर्थिक मदत मागील वर्षी मिळाली होती काय ? होय / नाही

अ) मिळाली असल्यास किती रक्कम मिळाली? रुपये ------------------------

ब) या वर्षी अशा प्रकारची आर्थिक मदत मंजूर झाली आहे काय ? होय/नाही

क) वर नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्ती, विद्यावेतन इ. शुल्क सवलतीसाठी अर्ज केला आहे काय? होय/नाही

या योजनेतील सर्व नियमांचे मी पालन करीन. माझ्याकडून सदर योजनेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास मला कमवा व शिका योजनेतून काढून टाकण्यास माझी हरकत नाही.

ठिकाण :

दिनांक : (विद्यार्थ्याची सही)

माझ्या मुलाने/मुलीने/पाल्याने या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती सत्य असून, तो/ती कमवा व शिका योजनेच्या सर्व नियमांचे पालन करील. त्याला/तिला या योजनेत प्रवेश घेण्यास माझी पूर्णपणे संमती आहे.

ठिकाण :

दिनांक : (वडील/आई/पालकांची सही)

नाव :

---

## विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याची शिफारस

श्री./श्रीमती यांनी सन २०१ - २०१ मध्ये महाविद्यालयात या वर्गात प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्याची सर्व संबंधित कागदपत्रे मी तपासली असून, या विद्यार्थ्यास/विद्यार्थिनीस कमवा व शिका योजनेत प्रवेश देण्यात यावा / देऊ नये, अशी शिफारस विद्यार्थी कल्याण सल्लागार समितीने केली आहे.

दिनांक : विद्यार्थी कल्याण अधिकारी

---

## कार्यालयीन शेरा

श्री./श्रीमती -------------------------------------- यांना **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका** योजनेत चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्यात आला आहे/नाही.

दिनांक : विद्यार्थी कल्याण अधिकारी मा. प्राचार्य/ मा. संचालक